# देहू नगरपंचायत कार्यालय, ता.हवेली, जि.पुणे

## विशेष सभा

दुपारी : १२.३०     विषय पत्रिका पोहोच     सभा दि. ३०/०७/२०२४

वार :- मंगळवार

| अ.क्र. | सदस्य नाव | सही |
|---|---|---|
| १ | सौ.पुजा अमोल दिवटे (नगराध्यक्षा) | P. Divate |
| २ | श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण (उपनगराध्यक्ष) | Dhanshri |
| ३ | श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल | |
| ४ | सौ.मीना राहुल कु-हाडे | |
| ५ | सौ.रसिका स्वप्निल काळोखे | R S KALOKHE |
| ६ | सौ.शितल अनिल हगवणे | |
| ७ | सौ.पूनम विशाल काळोखे | |
| ८ | श्री.योगेश हनुमंत काळोखे | Ashwini |
| ९ | सौ.पूजा सुमित काळोखे | |
| १० | सौ.स्मिता शैलेश चव्हाण | 4:56 P.A |
| ११ | श्री.सुधीर सुरेश काळोखे | |
| १२ | सौ.पोर्णिमा विशाल परदेशी | S.D. Salunke |
| १३ | सौ.सपना जयेश मोरे | |
| १४ | सौ.प्रियांका अभिजित मोरे | |
| १५ | श्री.प्रविण रामदास काळोखे | |
| १६ | श्री.आदित्य चिंतामण टिळेकर | |
| १७ | सौ.ज्योती गोविंद टिळेकर | |
| १८ | श्री.सचिन संभाजी साळुंखे | |
| १९ | श्री.प्रदिप मनोहर परंडवाल | P. Parandwal |

Scanned with OKEN Scanner

# देहू नगरपंचायत कार्यालय, देहू, ता.हवेली, जि.पुणे

Email : vdodehu@gmail.com

=====================================================================

जा.क्र.प्रशासन/ / २०२४-२५ दिनांक :- /०७/२०२४

विशेष सभा

नमुना (नियम ३ पहा)

याव्दारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची विशेष सभा वार मंगळवार दि. ३०.०७.२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता देहू नगरपंचायत कार्यालय सभागृहात होणार आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे हि विनंती.

नमूद 'अ' चे जोडपत्र

देहू नगरपंचायतीची विशेष सभा वार मंगळवार दि. ३०.०७.२०२४ रोजीचे विशेष सभेपुढील चालवायचे कामकाजाबाबत सभेपुढील विषय.

१) देहू शहरामधील नगरपंचायतीच्या मालकीच्या जागा ताब्यात घेऊन ७/१२ वर नगरपंचायतचे नाव लावणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.
२) देहू नगरपंचायत क्षेत्रामध्ये पे ॲन्ड युज बेसिसवर कमर्शियल टॉयलेट बांधणेबाबात विचार विनीमय करून निर्णय घेणे.
३) देहू नगरपंचायत क्षेत्रामध्ये LED स्क्रिन बसविणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.
४) देहू नगरपंचायतीची वेबसाईट तयार करणेस व सदरकामी निवीदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.
५) देहू शहरातील नागरिकांचे तक्रार नोंदविणे व सहाय्यतेसाठी नगरपंचायतीकरिता टोल फ्रि नंबर घेणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.
६) नगरपंचायतीच्या विविध व नियमित कामांसाठी नगरपंचायत फंडामधून JCB मशीन खरेदी करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.
७) देहू नगरपंचायतीच्या दिवाणी व फौजदारी न्यायालय, जिल्हा सत्र न्यायालय, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय येथील केसेस चालविणेकरिता वकीलांचे पॅनेल नेमणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

नगरपंचायत स्थापना सन २०२० देहू ता. हवेली, जि. पुणे

सौ.पुजा दिवटे
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत, देहू

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
विशेष सभा/इतिवृत्त/२४-२५ ठराव क्र. ०१
दि. ३०/०७/२०२४

विषय :- देहू शहरामधील नगरपंचायतीच्या मालकीच्या जागा ताब्यात घेऊन ७/१२ वर नगरपंचायतचे नाव लावणेबाबत विचारविनिमय करून निर्णय घेणे.

ठराव :- यावेळी देहू नगरपंचायत हद्दीतील पूर्वीचे देहू ग्रामपंचायत किंवा सरपंच,देहू ग्रामपंचायत या नावे असलेल्या जागा ७/१२ उतारा तसेच गावठानामधील जागा सिटी सर्व्हे उतारा वर देहू नगरपंचायतचे नावे करणेबाबत सभेने निर्देश दिले.

तसेच देहू नगरपंचायत हद्दीतील सांडपाण्याचे नियोजन करणे तसेच इंद्रायणी नदीचे प्रदूषण रोखणेकरिता सांडपाण्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे.देहू शहराकरिता असलेली विद्यमान भुयारी गटर योजना व STP हि शहराच्या लोकसंख्यनुसार कमी क्षमतेचे असून मौजे माळीनगर व विठ्ठलनगर मधील यापूर्वीच्या भुयारी गटर योजने नंतर नव्याने विकसित झालेल्या क्षेत्रात भुयारी गटर लाईन चे काम झालेले नाही.

तरी यापूर्वीचे भुयारी गटर योजने चे काम झाले नंतर नव्याने विकसित झालेल्या क्षेत्रात नवीन योजना करणे व त्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणे करिता मलशुद्धीकरण प्रकल्प (Sewage Treatment Plant) उभारणे आवश्यक आहे.देहू शहराकरिता विकेंद्रित STP उभारणे चे करिता मौजे माळीनगर,सर्व्हे क्र.१३६ व मौजे विठ्ठलनगर,सरकारी गायरान सर्व्हे क्र.९७ मधील जागा संपादित करणे आवश्यक आहे.

यावेळी सभेमध्ये सदरचे विषयाबाबत चर्चा झाली व मौजे माळीनगर सर्व्हे क्र.१३६ मधील प्रकल्पाकरिता आवश्यक जागा जमीन मालकांना TDR उपलब्ध करून देण्यात व जमीन संपादित करणेत यावी असे ठरले.तसेच मौजे विठ्ठलनगर सरकारी गायरान मधील STP उभारणे करिता आवश्यक असलेली जागा संपादित करणे करिता जागा मागणी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे सादर करणेचे सूचना सभेमार्फत देणेत आल्या.

सुचक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक:- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

विशेष सभा
दिनांक :- ३०/०७/२०२४
विषय क्रमांक :- २
ठराव क्र.

**विषय— देहू नगरपंचायत क्षेत्रामध्ये पे ॲन्ड युज बेसिसवर कमर्शीअल टॉयलेट बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू शहरात आषाढी सोहळा, संत तुकाराम बीज सोहळा, कार्तीकी यात्रा सोहळा या कालावधीमध्ये शहरात लाखोंच्या संख्येने वारकरी व भाविक येतात आणि दैंनदिन तरंगती लोकसंख्या पाहता देहू शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र येथे असलेले पुर्वीचे शौचालय नादुरुस्त असून पुर्ण:त मोडकळीस आलेले आहे आणि तसेच पी एम टी बसस्थानक समोरील असलेले शौचालय देखील नादुरुस्त आहे त्यामुळे त्या ठिकाणी नव्याने शौचायल बांधणे गरजेचे आहे. शौचालयाची दैंनदिन साफ सफाई राहावी आणि नगरपंचायतीकडे अपुरा असणारा निधी याकरीता built oprate transfer या धरतीवर शौचालय बांधणेस एन जी ओ संस्था किंवा इतर संस्था बांधण्यास तयार असल्यास आणि स्वत: देखभाल दुरुस्ती करण्यास इच्छुक असल्यास संबधित संस्थेमार्फत बांधकाम करुन त्याची सर्व जबाबदारी संबधित संस्थेवर देण्यात यावी त्या अनुंषगाने शासन नियम प्रमाणे कायदेशीर प्रक्रीया पुर्ण करावी त्यानुसार ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सौ प्रियांका मोरे
सुचक

सौ. सपना मोरे
अनुमोदक

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
विशेष सभा/इतिवृत्त/२४-२५ ठराव क्र. ०३
दि. ३०/०७/२०२४

विषय-३ :- देहू नगरपंचायत क्षेत्रामध्ये LED स्क्रीन बसविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव :- देहू नगरपंचायत हद्दीतील नगरपंचायत मालकीच्या जागेवर तसेच नवीन तयार करणेत आलेले बस थांबे येथे LED डिजिटल डिस्प्ले स्क्रीन बसवून त्याद्वारे नगरपंचायतीस उत्पन्न सुरु होईल या अनुषंगाने सभेमध्ये चर्चा करणेत आली.देहू नगरपंचायत हद्दीत नव्याने अनेक ठिकाणी बस थांबे उभारणेत आलेले आहेत तसेच देहू नगरपंचायत हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक व जिल्हा परिषद शाळा येथे यावेळी LED डिजिटल डिस्प्ले स्क्रीन उभारणे बाबत सभेमार्फत सुचविणेत आले.

सदरचे LED डिजिटल डिस्प्ले स्क्रीन उभारणे करिता BOT तत्वावर निविदा प्रक्रिया करून सदरचे LED डिजिटल डिस्प्ले स्क्रीन हे निविदा धारकाने स्वतः उभारायचे आहे.पहिले ०२ वर्षाकरिता प्रती LED डिजिटल डिस्प्ले वार्षिक ४.०० लक्ष रु. देहू नगरपंचायतीस जमा करावे.सदरचा करार हा १० वर्षाकरिता ठेवणेत यावा व पहिल्या ०२ वर्ष्यानंतर तिसऱ्या वर्षी प्रती LED डिजिटल डिस्प्ले वार्षिक ०६.०० लक्ष व त्यापुढील प्रत्येक वर्षाकरिता त्यापूर्वीचे लगतचे वर्षाच्या शुल्कामध्ये १०% वाढ देण्यात येऊन वार्षिक शुल्का ची आकारणी करणेत यावी असे ठरले.सदरचे १० वर्षाचे कराराचे कालावधीत देखभाल तसेच दुरुस्ती चा संपूर्ण खर्च संबंधित कंत्राटदाराने करावा.सदर कामाचा १० वर्षाचा कालावधी पूर्ण झालेनंतर सदर कामातील सर्व LED डिजिटल डिस्प्ले स्क्रीन व इतर साहित्या सहित देहू नगरपंचायतीस सुस्थितीमध्ये हस्तांतरित करणे आवश्यक राहील.तसेच देहू नगरपंचायत मार्फत करणेत येणारे जाहिराती व सूचना विनामुल्य प्रकाशित करणेत बंधनकारक राहील.

तसेच LED डिजिटल डिस्प्ले स्क्रीन हे केवळ सकळी ०८:०० ते दुपारी १२:०० व दुपारी ४:०० ते रात्री ९:०० या कालावधी मध्ये चालू ठेवणेबाबत ठरले.तसेच एका जाहिरातीचा प्रती LED डिजिटल डिस्प्ले वर एका महिन्याकरिता प्रसिद्ध करणेचा दर कमाल ३०,०००/- रु निच्छित ठेवून त्या अनुषंगाने निविदा करणेत यावी असे ठरले.

सुचक:- श्री.आदित्य चिंतामण टिळेकर

अनुमोदक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली, जि. पुणे.

देहू नगरपंचायत
विशेष सभा

विषय क्रमांक ०४

ठराव क्रमाक -05 दिनांक :- ३०/०७/२०२४

विषय – देहू नगरपंचायतची वेबसाईट तयार करणेस व मोबाईल अप्लिकेशन सदरकामी निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सध्या स्थिस्तीत देहू नागरपंचायतीची अधिकृत वेब साईट नसल्यामुळे नगर पंचायती मध्ये चालणारी सर्वसाधारण कामे , नगर पंचायतीच्या योजना ,नगरपंचायत पदाधिकारी,अधिकारी,विविध विभागाच्या कामासबंधित निविदा विविध परवानग्या, नगर पंचायतीचे जनजागृती संबधित संदेश,व इतर अनुषंगिक कामे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचवणे शक्य होत नाही यामुळे नगर पंचायतीची अधिकुत वेबसाईट असणे अति आवश्यक आहे .

वरील बाबींचा विचार करता हि सभा असे ठरविते कि , नगरपंचायत देहू ची वेबसाईट व मोबाईल अप्लिकेशन असणे अतिआवश्यक बाब आहे . वेबसाईट तयार करण्याचा निविदा प्रक्रिया राबविण्यास हि सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे .

व सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री. योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक: श्री प्रवीण रामदास काळोखे

नगरपंचायत देहू स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे.

सौ पूजा अमोल दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

# देहु नगरपंचायत देहु
## ता हवेली, जि. पुणे.

देहू नगरपंचायत

**विशेष सभा**

षय क्रमांक ०५ | ठराव क्रमाक -05 दिनांक :- ३०/०७/२०२४

षय - देहू शहरातील यात्राकालीन नियोजन,आपत्ती व्यवस्थापन ,नागरिकांचे दैनदिन समस्यांचे निवारण व सहाय्यातेसाठी नगरपंचायत कार्यालयाकारिता टोल फ्री नंबर घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सध्या स्थिस्तीत देहू मध्ये यात्रा काळात हजारोंच्या संख्येने भाविक येतात त्यावेळी मोबाईल वर जाम होवून प्रशासकीय संपर्क करण्यास अडथळा निर्माण होतो तसेच अप्पी व्यवस्थापन व कार्यालयाच्या प्रशासकीय कामासाठी र्यालयाचा दूरध्वनी क्रमांक असणे अति आवश्यक आहे .

वरील बाबींचा विचार करता हि सभा असे ठरविते कि , नगरपंचायत देहू चा स्वतंत्र दूरध्वनी क्रमांक असणे हि अतिआवश्यक ब आहे त्यामुळे कार्यालयास दोन टोल फ्री क्रमांक घेण्यास हि सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे .

**व सर्वानुमते मंजूर**

सूचक : श्री. योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक: श्री प्रवीण रामदास काळोखे

सौ पूजा अमोल दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. विशेष सभा

विषय क्रमांक - 06
दिनांक -30/07/2024

ठराव क्रमांक- 06
दिनांक -30/07/2024

**विषयाचे नाव- नगरपंचायतीच्या विविध व नियमित कामांसाठी नगरपंचायत फंडातून JCB मशीन खरेदी करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

देहू नगरपंचायत हद्दीत विविध विभागांमार्फत विकास कामे तसेच दैनदिन कामे सुरु असतात. या कामांकरिता देहू नगरपंचायतीस दररोज JCB मशीनीचा वापर करण्यात येतो. आरोग्य विभाग,बांधकाम विभाग तसेच अतिक्रमण विभागाकरिता देखील JCB मशीन वापरण्यात येते. तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये देखील JCB मशीन आवश्यक असल्याने वरील सर्व बाबींचा विचार करता नवीन JCB मशीन घेणे गरजेचे असून या कामाला ला हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर कामाची खरेदी GEM पोर्टल मार्फत करून घेनेस तसेच या कामी येणाऱ्या सर्व अनुषांगीक (डीझेल व इत्यादी) खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते देत आहे.

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फंडातून/ विविध शासकीय योजनेतून करण्यात यावा .

सूचक : श्री. आदित्य टिळेकर

अनूमोदक : सौ. ज्योती टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

# देहू नगरपंचायत, देहू

मा.विशेष सभा

विषय क्रमांक :- ०७ ठराव क्रमांक :- ०७

दिनांक :- ३०/०७/२०२४ दिनांक :- ३०/०७/२०२४

विषय क्र.०७ :- देहू नगरपंचायतीच्या दिवाणी व फौजदारी न्यायालय, जिल्हा सत्र न्यायालय, उच्च न्यायालय व सर्व्वोच्च न्यायालय येथील केसेस चालविणेकरिता वकीलांचे पॅनेल नेमणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. ०७ :- सदर विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदींनुसार शहरातील नागरिकांना आवश्यक मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देणेची नगरपंचायतचे कर्तव्य आहे. त्याअनपुषंगाने दैनंदिन कामकाज करत असताना मा.परिषदेच्या धोरणाचे अनुषंगाने प्रशासनास जनहिताची कामे करताना काही कठोर निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे नगरपंचायत विरूध्द संबंधित संस्था, नागरिक वा व्यक्ती विविध न्यायालयामध्ये खटले दाखल करतात. देहू नगरपंचायत मध्ये सदरचे दावे चालविणेसाठी पद मंजूर नसलेमुळे दाखल दाव्यामध्ये वेळेवर से दाखल करणे, केसेसला हजर रहाणे अपुरे कर्मचारी वर्गामुळे शक्य होत नाही व यामुळे नगरपंचायतचे विरूध्द निकाल लागण्याची शक्यता वाढते. त्यामुळे नगरपंचायतचे विरूध्द दिवाणी व फौजदारी न्यायालय, जिल्हा सत्र न्यायालय, उच्च न्यायालय व सर्व्वोच्च न्यायालय येथील दाखल होणारे दावे चालविणेसाठी वकीलांचे पॅनल नियुक्त करणे आवश्यक आहे.

तसेच वकीलांचे पॅनल नियुक्त करताना संबंधित न्यायालय येथील कामकाज करत असलेल्या विधीज्ञाची सदर कामी नियुक्ती करावी. तसेच मा.शासनाचे दरानुसार दाव्यातील टप्पयानुसार वकील फी अदा करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक कार्यवाही मुख्याधिकारी यांनी करावी.

सुचक :- श्री.योगेश ह.काळोखे

अनुमोदक :- सौ.स्मिता शै.चव्हाण

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक ३०/०७/२०२४

देहू नगरपंचायत, देहू